प्रेसनोट

दि.२१/९/२०१९

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | राहुरी पो.स्टे., जि.अहमदनगर गु.र.नं.३००७/२०१७ |
| कलम | ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | ज्ञानदेव बन्सीलाल वाघमारे, पोलीस हवालदार, बक्कल नं.१३२०, वर्ग–३, तत्कालीन नेमणुक राहुरी पो.स्टे. |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ४०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ४०००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, आरोपी लोकसेवक ज्ञानदेव बन्सीलाल वाघमारे, पोलीस हवालदार, बक्कल नं.१३२०, नेमणुक राहुरी पो.स्टे. यांनी तक्रारदार यांची पत्नी व मुलगा यांचेविरुध्द राहुरी पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या तक्रारीवरुन त्यांना अटक न करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे दि.४/२/२०१७ रोजी पंचासमक्ष ६,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ४,०००/– रुपये लाचेची मागणी केली व दि.४/२/२०१७ रोजी ४,०००/– रुपये लाचेची रक्कम पंचांसमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडले होते. त्यांच्याविरुध्द राहुरी पो.स्टे., जि.अहमदनगर येथे दि.४/२/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>सदर सापळा कारवाई इरफान शेख, तत्कालीन पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर यांनी केली होती व त्यांनी गुन्हयाचा तपास पूर्ण करुन मा.विशेष न्यायालय, अहमदनगर येथे नमुद आरोपीविरुध्द दि.१४/९/२०१७ रोजी दोषारोपपत्र दाखल केले होते.<br>सदर खटल्याची सुनावणी मा.श्री.ए.एम.शेटे, विशेष अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे समोर होऊन पोलीसांनी केलेला चांगला तपास व महत्वाच्या साक्षीच्या आधारे मा.न्यायालयाने आरोपी लोकसेवक ज्ञानदेव बन्सीलाल वाघमारे यांना आज दि.२१/९/२०१९ रोजी १)ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे ३ वर्ष साधे कारावासाची शिक्षा व १ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद २)ला.प्र.का.सन १९८८ चे कलम १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे ३ वर्ष साधे कारावासाची शिक्षा व १ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.<br>सदर खटल्याचे सरकार पक्षातर्फे ॲड.ए.व्ही.ढगे, सहायक सरकारी अभियोक्ता, अहमदनगर यांनी काम पाहिले असून त्यांना महिला पो.कॉ.संध्या म्हस्के यांनी मदत केली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in
ई–मेल ऑनलाईन तक्रार :– acbwebmail@mahapolice.gov.in
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७
व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(हरीष खेडेकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर

Scanned by CamScanner